# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.04.2025** **वार- गुरुवार**

---

**दीनानाथ मंगेशकर**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गरोदर महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने तिचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची प्राथमिक चौकशी समितीमार्फत झाली असून, त्यात रुग्णालयाला दोषी ठरवण्यात आलं आहे. या प्रकरणी रुग्णालयावर कारवाई करण्याची शिफारस महापालिका आणि धर्मादाय आयुक्तांनी केली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांसह आरोग्यसेवा उपसंचालक, सहायक संचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि आरोग्यसेवा विभागाचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश असलेली समिती नेमली होती. या समितीने प्राथमिक चौकशी अहवाल नुकताच सादर केला आहे.

**आयएमए**

पुणे शहरातील सर्व खासगी रुग्णालयांना आपत्कालीन उपचारांसाठी रुग्णांकडून अनामत रक्कम न घेण्याचा आदेश  पुणे महापालिकेनं दिला असून त्याला इंडियन मेडिकल असोसिएशन आणि हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाने विरोध केला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात नुकत्याच घडलेल्या प्रकरणानंतर खासगी रुग्णालयांच्या पुणे शाखेची बैठक झाली; यामध्ये दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील आंदोलन आणि त्यादरम्यान केलेलं  नुकसान याबद्दलही निषेध व्यक्त करण्यात आला.

**पिंपरी चिंचवड**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेनेही आपल्या हद्दीतील खासगी रुग्णालयांसाठी नियमावली जारी केली आहे. रुग्णांच्या आर्थिक क्षमतेचा

विचार न करता गंभीर स्वरूपाच्या रुग्णांना प्राधान्याने तातडीने सेवा उपलब्ध करून द्यावी; जीविताच्या  रक्षणासाठी आपत्कालीन मूलभूत सोयीसुविधा, अद्ययावत उपकरण साधनसामग्री, प्रशिक्षित डॉक्टर, कर्मचारी वर्ग तत्पर असावा, अशा विविध सूचना या नियमावलीमध्ये आहेत.

**महावीर जयंती**

तीर्थंकर भगवान महावीर स्वामीजींचा 2624 वा जन्म कल्याणक महोत्सव आज सर्वत्र उत्साहात आणि आनंदात साजरा होत आहे. या निमित्त पुण्यात आज सकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली. श्री जैन सामुदायिक उत्सव समितीनं मिरवणुकीचं आयोजन केलं होतं. जय जिनेंद्र, भगवान महावीर की जय; अशा घोषणा देत हजारोंच्या संख्येने जैन धर्मीय नागरिक या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

**महिला आयोग**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत पुणे जिल्हयातील तक्रारींची जनसुनावणी येत्या 15 ते 17 एप्रिल या कालावधीत होणार आहे. पुणे शहरातील तक्रारींची सुनावणी 15 एप्रिल रोजी, पुणे ग्रामीणसाठीची 16 एप्रिल रोजी, तर पिंपरी चिंचवडमधील सुनावणी 17 एप्रिल रोजी होणार आहे. या जनसुनावणीत महिलांनी न घाबरता पुढे येऊन आपल्या तक्रारी मांडाव्यात, असं आवाहन आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केलं आहे.

**प्रदूषण नियंत्रण**

मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पासाठी केंद्र सरकारनं 27 मार्च रोजी पुणे महापालिकेला 171 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र, राज्य शासनाने या निधी वापरासाठीचा आदेश अद्याप काढलेला नसल्याने प्रकल्प अंतिम टप्प्यात असताना महापालिकेला अडचणींचा सामना करावा लागत आहे. राष्ट्रीय नदीसंवर्धन योजनेअंतर्गत, जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीच्या सहकार्यातून हा प्रकल्प राबवला जात आहे. प्रकल्पाचं जवळ जवळ 85 टक्के काम पूर्ण झालं आहे.

**पुणे मनपा**

पुणे शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक सुधारण्यासाठी कात्रज – कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचं काम हाती घेण्यात आलं आहे. गेल्या सहा वर्षात या रस्त्यासाठी 43 हजार 456 चौरस मीटर जागेचं भूसंपादन झालं आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अप्पर आयुक्त आणि मालमत्ता विभागाचे प्रमुख महेश पाटील यांनी आज दिली. या रस्त्यांच्या भूसंपादनासाठी 710 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून 250 कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारनं दिला आहे.

**शिधा पत्रिकाई-केवायसी**

पुणे जिल्ह्यात 18 लाख शिधापत्रिकाधारकांनी ई-केवायसी पूर्ण केली असून, ही संख्या एकंदर लाभार्थ्यांच्या 67 टक्के आहे. अजूनही 8 लाख 80 हजार नागरिकांची ई-केवायसी प्रक्रिया प्रलंबित आहे. जिल्ह्यात एकंदर 26 लाख 75 हजार 311 ग्राहकांचं ई-केवायसी करण्याचं उद्दिष्ट पुणे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाला देण्यात आलं आहे. सर्व शिधापत्रिका धारकांनी 30 एप्रिलपर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असं पुणे जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी कळवलं आहे.

**महावितरण**

महावितरणच्या पुणे विभागामध्ये वीजग्राहकांची सर्वाधिक नोंद झाली असून, 39 लाख 17 हजार 701 ग्राहकांना वीजसेवा देण्यात आली आहे. वीजजोडणी देण्यामध्येही पुणे विभाग अग्रेसर असून, गेल्या दोन वर्षांत विक्रमी 4 लाख 34 हजार वीजजोडण्या दिल्या असल्याचं महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी सांगितलं.

**फसवणूक**

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने बाणेर इथून साडेपाच लाख रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 तर किमान तापमान 24 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**